# शोध निबंध स्पर्धा

## माननीय मुख्यमंत्री साहेब, मला काही सांगायचे आहे....

### ग्लोबलायझेशनच्या युगात विदर्भातील युवक मागे का?

**- विदर्भातील युवकांपुढील बेरोजगारी व करिअर निर्मितीतील समस्या या विषयावर लघू शोधनिबंध मागविण्यात येत आहेत.**

- या विषयावर सरधोपट पद्धतीने निबंध न लिहिता तो इनोव्हेटिव्ह व विषयाच्या अधिक शास्त्रीय, व्यवहार्य व परिणामकारक हवा

- बेरोजगारी व करिअर घडविण्यातील अडचणींची प्रमुख दहा कारणे, त्याचे थोडक्यात विश्लेषण आणि उपाय योजना हा आपल्या लघू शोधनिबंधाचा गाभा हवा

- सर्वोत्कृष्ट, व्यवहार्य व नाविण्यपूर्णतेने परिपूर्ण असलेल्या निवडक निबंधांना पारितोषिके देण्यात येणार आहेत.

- स्पर्धेतील प्रथम पारितोषिक प्राप्त शोधनिबंधाला 21 हजार रुपये रोख, दवितीयला 15 हजार रुपये रोख व तृतीयला 10 हजार रुपये रोख.

- 18 ते 30 वयोगटातील 10 युवकांना प्रत्येकी 5 हजार रुपयांची प्रोत्साहनपर पारितोषिके

- यातील निवडक निबंधांचा समावेश एका विशेष अहवालात करून तो मा. मुख्यमंत्र्यांना देण्यात येणार आहे.

- उत्कृष्ट 100 निबंधांना विशेष प्रमाणपत्रे देण्यात येतील

– परीक्षक मंडळ हे विदर्भातील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व नामवंत व्यक्तीचे असेल व तेच निबंधाचे मूल्यमापन करून निकाल जाहीर करतील.

- निबंध स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कोणतीही वयोमर्यादा नाही

- निबंध मराठी,हिंदी,इंग्रजी या भाषांत पाठविता येतील

- स्पर्धेचे सर्व अधिकार आयोजकांकडे राखीव आहेत

- निकालाबाबत कोणताही आक्षेप नोंदविता येणार नाही

- एकदा निबंध सादर झाल्यानंतर तो कोणत्याही स्थितीत परत केला जाणार नाही तसेच त्याच्या वापराचे सर्व अधिकार आयोजकांकडे आहेत

- या शोध निबंध स्पर्धेतील सहभाग विनामूल्य आहे.

- स्पर्धेचे नियम, अटी व अन्य माहितीसाठी आपण www.visionnext.org या संकेतस्थळाला भेट देऊ शकता.

- आपला शोधनिबंध 25 जून 2015 रोजी पर्यंत आयोजकांकडे पोहोचायला हवा.

–शोध निबंध पाठवितांना आपले संपूर्ण नाव, पत्रव्यवहाराचा पत्ता, संपर्क क्रमांक व ई–मेल द्यावा.
- शोध निबंध प्रत्यक्ष, पोस्टाने, कुरिअरद्वारे खालील पत्यावर पाठवू शकता किंवा ई-मेलही करता येईल.

- शोधनिबंध पाठविण्याचा पत्ता -

व्हिजन नेक्स्ट फाउंडेशन,

पहिला माळा, हर्षदा अपार्टमेन्ट,

संजीवनी हॉस्पिटल समोर,

आठ रस्ता चौक, लक्ष्मीनगर,

नागपूर

- ई-मेल-info@visionnext.org

--------------------------------

- व्हिजन नेक्स्ट फाउंडेशन हे युवकांसाठी नवे व्हिजन घेऊन आले आहे. आजच्या युगातील युवकांमध्ये रोजगारक्षम कौशल्ये विकसित करणे, रोजगाराच्या संधी युवकांपर्यंत पोहोचविणे आणि भविष्यातील आव्हाने व संधींचा मेळ घालून युवकांकरिता विविध कार्यशाळा, कौशल्य विकास कार्यक्रम, जॉब व करिअर फेअर आदी उपक्रम घेऊन येत आहे.

---------------------

- मा. देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने आपल्याला युवा व अभ्यासू मुख्यमंत्री मिळाले आहेत. युवकांना सध्याच्या युगासोबत नेण्याची त्यांची दृष्टी वेगळी आहे. ते मुख्यमंत्री झाल्यापासून नागपूर, विदर्भाच्या विकासासाठी झपाट्याने पावले पडत आहेत. विविध विकास प्रकल्पांच्या केवळ घोषणांवरच ते थांबलेले नाहीत तर त्या घोषणा प्रत्यक्षात साकारण्यासाठीची कामेही वेगाने सुरू आहेत. आजपर्यंत विदर्भाने विकासाचा हा झंझावात बघितलेला नाही. विदर्भ विकासापासून युवकांना वेगळे करता येत नाही. त्यामुळे युवकांना अधिकाधिक रोजगार व करिअर संधी उपलब्ध व्हाव्यात या हेतून ही शोधनिबंध स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे.

----------------------------------------------------------

**प्रेस नोट**

## माननीय मुख्यमंत्री साहेब, मला काही सांगायचे आहे....

### ग्लोबलायझेशनच्या युगात विदर्भातील युवक मागे का?

### व्हिजन नेक्स्ट् फाऊंडेशनचा उपक्रम

देशात ग्लोबलायझेशनला सुरुवात होऊन दोन दशकांहून अधिक काळ लोटला आहे. या काळात छोटी-छोटी राज्ये पुढे गेले. काही राज्यांनीही स्मिमित करणारी प्रगती साधली. आपला महाराष्ट्रही देशात आघाडीचे राज्य आहे. मग विदर्भातील युवक आजच्या स्पर्धेत मागे का? विदर्भातील रोजगार संधींची अत्यल्प संख्या आणि रोजगारक्षम कौशल्यांचा अभाव ही स्पर्धेच्या सध्याच्या युगात वैदर्भीय युवकांपुढील प्रमुख समस्या वाटतात. विदर्भातील शिक्षणात रोजगारक्षम कौशल्याचा अभाव असल्याचे विदर्भ वैधानिक विकास मंडळाच्या तज्ज्ञांनीही म्हटले आहे. त्यामुळे विदर्भ विकास होत असताना युवकांना अधिकाधिक संधी मिळणे गरजेचे आहे. विदर्भातील बेरोजगार व करिअर निर्मितीतील काय अडचणी आहेत. याबाबत समाजातील प्रतिभावंत, उद्योजक, साहित्यिक, चळवळीतील कार्यकर्ते, युवक, विद्यार्थी, महिला आदी सर्व घटकांना काय वाटते हे जाणून घेण्यासाठी आम्ही ही शोधनिबंध स्पर्धा आयोजित केली आहे. विदर्भातील युवकांपुढील बेरोजगारी व करिअर निर्मितीतील समस्या या विषयावर लघू शोधनिबंध मागविण्यात येत आहेत. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क नाही. तसेच वयोगटाचीही अट नाही. अपेक्षा केवळ ही आहे की, हा शोध निबंध सरधोपट पद्धतीने न लिहिता त्या विषयाचे गांभीर्य ओळणारा आणि काही इनोव्हेटिव्ह सजेस्ट करणारा अपेक्षित आहे.

या स्पर्धेतून प्राप्त निवडक निबंधांना पुरस्कार व प्रोत्साहनपर पारितोषिके देण्यात येणार आहेत. शिवाय निवडक शोध निबंधांतील निवडक कंटेन्टचा समावेश मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात येणा-या अहवालातही करण्यात येणार आहे.

व्हिजन नेक्स्ट फाउंडेशन हे युवकांसाठी नवे व्हिजन घेऊन आले आहे. विदर्भातील युवकांना नव्या संधींचा लाभ घेण्यास मदत करण्यासाठी विविध क्षेत्रातील तज्ज्ञ आणि उद्योजक मिळून ही संस्था निर्माण झाली आहे. आजच्या युगातील युवकांमध्ये रोजगारक्षम कौशल्ये विकसित करणे, रोजगाराच्या संधी युवकांपर्यंत पोहोचविणे आणि भविष्यातील आव्हाने व संधींचा मेळ घालून युवकांकरिता विविध कार्यशाळा, कौशल्य विकास कार्यक्रम, जॉब व करिअर फेअर आदी उपक्रम घेऊन येत आहे. विदर्भातील अधिकाधिक युवकांना रोजगारक्षम बनविण्याचा ध्यास आम्ही घेतला आहे. त्यामुळे केवळ नागपूरपुरते मर्यादित न राहता विदर्भाच्या कानाकोप-यात आमची संस्था पोहोचणार आहे.

याच अनुषंगाने हा पहिला उपक्रम असून या उपक्रमाद्वारे विदर्भातील युवकांच्या बेरोजगारीच्या व करीअरच्या समस्या ह्या शोध निबंधाद्वार मागवून व त्याचा अहवाल तयार करून मा. मुख्यमंत्र्याकडे सोपविण्यात येईल. या अहवालाचा उपयोग विदर्भातील युवकांचे कौशल्य निर्माण व करिअर घडविण्याकरीता करण्यात येणार आहे.